**झोपडीधारकांच्या पात्रतेबाबतचे परिशिष्ट २ तयार करताना सक्षम प्राधिकाऱ्यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत.**

## महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक : झोपुयो-२००८/ प्र.क्र. १०५/झोपसू १,
गृहनिर्माण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ४ जून , २००८.

संदर्भ : शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग क्र. झोपुयो-२००८/ प्र.क्र. १०५/झोपसू १,
दि.१७जानेवारी, २००८.

झोपडीधारकांच्या पात्रतेबाबतचे परिशिष्ट २ तयार करताना सक्षम प्राधिकाऱ्यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत उक्त संदर्भाधीन दि. १७ जानेवारी, च्या शासन परिपत्रकान्वये आवश्यक त्या मार्गदर्शनपर सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

शासन परिपत्रकातील अनुक्रमांक ६ मध्ये ‘‘शिधापत्रिका हा पुरावा पात्रतेसाठी स्विकारु नये’’ अशा सुचना आहेत. त्याऐवजी , ‘‘शिधापत्रिका हा पुरावा पात्रतेसाठी निर्णायक पुरावा म्हणून न स्विकारता परिपोषक पुरावा ( Corroborative evidence)म्हणून स्विकारण्यात यावा.’’ असे वाचण्यात यावे.

शासन परिपत्रक अनुक्रमांक ९ मध्ये पुढील मजकुराचा समावेश करण्यात यावा. ‘‘फोटो घेण्याचे काम सक्षम प्राधिकारी किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात यावे. तथापि, कॅमेरा/व्हीडीओग्राफीची व्यवस्था व खर्च विकासकामार्फत करण्यात यावा.’’

अनुक्रमांक १६ प्रमाणे विहीत केलेल्या नमुन्यात सर्व झोपडयांऐवजी ‘‘किमान १० टक्के झोपडयांची प्रत्यक्ष तपासणी स्वतः सक्षम प्राधिकाऱ्यांनी व २५ टक्के तपासणी त्यांचे नियंत्रणाखालील किमान गट ब दर्जाचे अधिकाऱ्यांनी व १०० टक्के तपासणी संबंधीत भूमापक किंवा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांनी करुन तसे केल्याचे प्रमाणित करावे.’’ असे वाचण्यात यावे.

४. अनुक्रमांक १७ कडील मजकूर वगळण्यात येत असून , त्याऐवजी "सक्षम प्राधिकारी यांनी प्रत्येक पात्र झोपडीधारकाचे तो सहकारी गृहनिर्माण संस्थेत सभासद होण्यास आणि संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस व विकासकास संमती असल्याच्या आशयाचे १०० रुपयाच्या स्टॅंप पेपरवर संमतीपत्र नोटीराईज घेण्यात यावे. पात्र झोपडीधारकांची ओळख पटविण्यासाठी व तोच झोपडीधारक आहे याची खात्री करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचे प्रतिनिधीचे उपस्थितीतच प्रत्यक्ष झोपडपट्टीत जाऊन झोपडीधारकांचे किमान एका बोटाचे ठसे बायोमेट्रीक तंत्रज्ञानाचा वापर करुन संबंधीत विकासकाचे खर्चाने घेण्यात यावे. तसेच त्याचवेळी झोपडीधारकांचा शक्यतो त्यांच्या कुटुंबीयांसह त्यांच्या झोपडीसमोर झोपडीचा क्रमांक स्पष्टपणे दिसेल अशा पध्दतीने छायाचित्र घेण्यात यावे. या प्रमाणे संकलित केलेली माहिती डाटाबेसच्या स्वरुपात सी.डी. (CD)अथवा तत्सम माध्यमावर तसेच छापील स्वरुपात सक्षम प्राधिकारी यांनी जतन करुन ठेवावी. " हा मजकूर समाविष्ठ करण्यात येत आहे.

५. शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग क्र. झोपुयो-२००७ / प्र. क्र. १०७ / झोपसू १, दि.१७ जानेवारी, २००८ या परिपत्रकातील सुचना दि. १७ जानेवारी, २००८ रोजी अथवा त्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे योजनेच्या प्रस्तावासोबत दाखल केलेल्या प्रारुप परिशिष्ट २ च्या बाबतीत लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या WWW.intranet.msharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक २००८०६४१७१२४२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अकृजगताप

( अ. कृ. जगताप )
उप सचिव, महाराष्ट शासन.

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

२. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.